REVIEW OF RESEARCH

# मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामातील सेनापती चंद्रसेन जाधवाजी कामगिरी

प्रा. डॉ. निलीमा राऊत

डॉ. पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



दक्षिण भारताच्या दृष्टीने १८ व्या शतकाचा पूर्वार्ध राजकीयदृष्ट्या प्रचंड अस्थिरतेचा आणि सत्तांतराचा ठरला आहे हे अभ्यासांती सहज लक्षात येईल. सन १७०७ मध्ये मोगल बादशहा औरंगजेबाचा मृत्यू झाला आणि उत्तरेबरोबरच दक्षिण भारताच्या राजकारणाची समीकरणे देखील बदलली. मराठा राज्यामध्येही महाराणी ताराबाई आणि छ. शाहू यांच्यात राजकीय वारसा संघर्षास सुरूवात झाली. छ. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठा राज्याच्या सातारा आणि कोल्हापूर अशा दोन गाद्या निर्माण झाल्या. दोन राज्यांच्या निर्मितीबरोबरच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून स्वराज्याची निष्ठेने सेवा करणाऱ्या जाधव, माने, पवार, घोरपडे, शिंदे, नाईक, मालुसरे, दाभाडे इ. घराण्यांच्या निष्ठादेखील विभागल्या गेल्या सेनापती धनाजी जाधवांच्या घराण्याने मात्र शिवकाळापासून ते छत्रपती शाहूला स्थिर करेपर्यंत स्वराज्याची निष्ठेने सेवा केली.

सेनापती चंद्रसेन जाधव मराठ्यांचे सरसेनापती धनाजी जाधवराव यांचे द्वितीय पुत्र होय.[१]

धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर सन (१७१०) चंद्रसेन जाधवांना मराठा राज्याचे सरसेनापती पद छत्रपती शाहू महाराजांनी बहाल केले आणि चंद्रसेन यांचा दुसरा भाऊ शंभुसिंग यास त्याचा मुतालिक म्हणून नेमले.[२] सेनापती चंद्रसेन जाधवांनी छ. शाहु, छ. शिवाजी व संभाजी तसेच मोगल या तिनही राजवटीमध्ये स्वपराक्रमाने आपल्या वंशजांचा स्वार्थ असा ठसा उमटविला. चंद्रसेन जाधव यांनी सन १७१३ मध्ये मोगलाईत प्रवेश केला. मोगल बादशहाने चंद्रसेन जाधवांना ७००० ची मनसब आणि ६० लक्ष उत्पन्नाचा प्रदेश जहांगिरी देऊन दक्षिणेच्या नायब सुभेदारपदी नेमले.[३] धनाजी जाधव यांनी ज्याप्रमाणे जाधव घराण्यामध्ये स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले त्याचप्रमाणे चंद्रसेन जाधवांनी भालकी (कर्नाटक) येथे जाधव घराण्याची स्वतंत्र शाखा स्थापन केली.[४] मोगलांचा दक्षिणेचा सुभेदार निजाम—उल—मुल्क याच्या दरबारात चंद्रसेन जाधवांचा मोठा दरारा होता.

सेनापती चंद्रसेन जाधव हे आपल्या पित्याप्रमाणे शूर, पराक्रमी, धाडसी, मुत्सदी राजकारणी असून कोल्हापूर आणि सातारा ही दोन्ही मराठा राज्ये एक करून एकछत्री मराठा राज्य निर्माण करण्यासाठी[५] चंद्रसेन जाधवांनी जीवनाच्या शेवटपर्यंत अखंड संघर्ष केला.

## चंद्रसेन जाधव — मराठी सत्तेच्या सरसेनापतिपदी :—

सरसेनापती धनाजी जाधवांच्या मृत्यूनंतर छ. शाहू महाराजांनी त्यांचा मुलगा चंद्रसेन जाधव यास शके १६६२ मध्ये (इ.स. १७१०) सरसेनापतिपदाची वस्त्रे दिली. यावेळी छ. शाहूची परिस्थिती अतिशय बिकट झाली होती. यावेळी महाराणी ताराबाईंनी चोहो बाजूकडून सरदारांना चिथवून शाहू महाराजांची अगदी गाळण केली होती. अशा बिकट परिस्थितीत छत्रपती शाहूचे सिंहासन स्थिर करण्यात सेनापती म्हणून चंद्रसेन जाधवांची भूमिका निर्णायक होती हे स्पष्ट होते.

सन १७११ मध्ये शाहू महाराजांनी

दमाजी थोरात व उदाजी चव्हाण वगैरे महाराणी ताराबाई समर्थक सरदारांवर सेनापती चंद्रसेन जाधव यास रवाना केले. त्यांचा बंदोबस्त करून मोगलाईतील मराठ्यांचे हक्क, चौथाई, सरदेशमुखी व घांसदाना ही वसूल करण्याचे काम सांगितले.[६] यावेळी शाहु महाराजांनी प्रस्तुत स्वारीमध्ये चंद्रसेन जाधवांबरोबर बाळाजी विश्वनाथासही बरोबर दिले होते. परंतु या स्वारीमध्ये उभयतांमध्ये वितुष्ट आले. आणि ते मराठा साम्राज्याच्या दुदैवाचे पराकोटीला गेले. बाळाजी विश्वनाथ व चंद्रसेन यांच्यातील हरणाच्या वादावरून निर्माण झालेला तंटा चंद्रसेन जाधव शाहूला सोडून जाण्यास कारणीभूत ठरला.[७]

## चंद्रसेन जाधवांचा महाराणी ताराबाई पक्षात प्रवेश व कामगिरी :—

चंद्रसेन जाधवांना समजावण्याचे प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर सेनापतीचा बंदोबस्त करण्यासाठी छत्रपती शाहूने सरलष्कर हैबतराव निंबाळकर आणि चंद्रसेन जाधव यांतील लढाईनंतर चंद्रसेन जाधव उघडपणे महाराणी ताराबाई पक्षाला मिळाला.[८]

"चंद्रसेन जाधवांनी शिखळ, वडगाव, कुमठे आणि कोल्हापूर इ. प्रदेश शाहू महाराजांशी लढून ताराबाई पक्षाला जिंकून दिले.[९] चंद्रसेन जाधवांचे बंड पुढे अनेक वर्षे कोल्हापूर आणि सातारा तसेच सातारा व निजाम या गाद्यांमधील संघर्षाच्या भौगोलिक सीमा वाढविण्यात मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरले.

चंद्रसेन जाधवांनी शाहू पक्षाकडील बहुतांश सरदारांना आपल्याकडे वळवून घेतले.

## महाराणी ताराबाई व चंद्रसेन जाधव यांच्यातील पत्रव्यवहार :—

सेनापती चंद्रसेन जाधवांस आपल्या पक्षात वळविण्यासाठी महाराणी ताराबाईंनी प्रारंभीपासूनच प्रयत्न केले होते. "ऑगस्ट १७१० मध्ये चंद्रसेनांनी जेव्हा धाऊर उर्फ फत्याबादच्या किल्ल्यास वेढा घातला होता त्यावेळी या परिसरात असतांना छत्रपती शाहूने तसेच महाराणी ताराबाईनेही चंद्रसेन जाधवरावास आपल्याकडे बोलविल्याची नोंद ७ ऑक्टोंबर १७१० च्या मोगल अरबरातीत आहे.[१०]

महाराणी ताराबाईंनी चंद्रसेन जाधवांच्या विविध गुणांच्या तसेच त्यांच्या कोल्हापूरच्या छत्रपतीविषयी असलेल्या एकनिष्ठतेचा गुण गौरव केला आहे. प्रतिनिधी मोरे व दाभाडे या मातब्बर मंडळींना एकत्रित शाहूविरूद्ध उभे केल्याबद्दल चंद्रसेन जाधवांचे ताराबाईंनी कौतुक केले आहे यावरून तत्कालीन मराठा राज्यातील सर्व महत्त्वपूर्ण सरदार घराण्यांना एकत्र आणून छत्रपती शाहूंच्या विरूद्ध एक मजबूत फळी निर्माण करण्यात चंद्रसेन जाधवराव यशस्वी झाले होते हेच वरील पत्रांवरून स्पष्ट होते.[११]

## चंद्रसेन जाधवरावकडून छत्रपती शाहूंचा पराभव :—

चंद्रसेन जाधवांच्या प्रवेशामुळे महाराणी ताराबाईची लष्करी ताकद वाढली. चंद्रसेन जाधवांकडे छत्रपती शाहूची सर्व मुख्य फौज होती. बाळाजी विश्वनाथला व छत्रपती शाहूला शह देण्यासाठी चंद्रसेनांनी सरळ साताऱ्यासच वेढा दिला.[१२] या स्वारीची खबर लागताच शाहू व बाळाजी सिंहगडाकडे पळून गेले. तेव्हा चंद्रसेन जाधवाने शाहूचा पाडाव करण्याकरिता त्वरित आगेकूच केली. चंद्रसेन जाधवाच्या स्वारीमुळे छत्रपती शाहू व बाळाजी विश्वनाथ यांना स्वत:चा बचाव करण्यासाठी दूरदूरवर फिरावे लागले. अशाप्रकारे चंद्रसेन जाधवरावांनी छत्रपती शाहू महाराज आणि बाळाजी विश्वनाथ यांची अवस्था दयनीय केली. यावरून चंद्रसेनाच्या अंगी असलेला पराक्रम आणि संघटन कौशल्य दिसून येते.

चंद्रसेन जाधवांच्या चिथावणीने छत्रपती शाहूविरूद्ध अनेक सरदारांनी बंड केले आणि हे बंड इतके प्रभावी होते की यामुळे शाहूची प्रारंभिक अवस्था अतिशय बिकट झाली. चंद्रसेनाने खटावकरांना इ.स. १७११ च्या शेवटी शाहूविरूद्ध चिथावणी देऊन शाहूच्या प्रदेशात धुमाकूळ घालावयास लाविले[१३] या काळात शाहूविरूद्ध होणाऱ्या बंडात चंद्रसेन जाधव व मोगल यांचा सक्रिय सहभाग होता. आणि छत्रपती शाहू महाराजांची प्रारंभीक सर्व शक्ती स्वकियांच्या आणि आपल्या अंतर्गत सरदारांचा बीमोड करण्यातच खर्च झाली.

## कोल्हापूरचे रक्तशून्य सत्तांतर (सन १७१४) :—

छत्रपती शाहू आणि महाराणी ताराबाई यांच्यातील सत्ता स्पर्धेचे राजकारण आणि स्पर्धेला चंद्रसेने जाधव व बाळाजी विश्वनाथ खतपाणी घालण्याचे काम करीत होते. परंतु महाराणी ताराबाईंच्या छत्रपती शाहूला नाहीसे करण्याच्या मनोरथाला, त्यांच्याच दरबारात घडलेल्या घटनांनी जबरदस्त हादरा बसला. "सन १७१४ मध्ये छत्रपती राजारामाची दुसरी पत्नी राजसबाई व तिचा मुलगा संभाजी यांनी महाराणी ताराबाई आणि कोल्हापूर गादीचा छत्रपती शिवाजी यास कैदेत टाकून स्वत: कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले.[१४] या सत्तांतरामुळे मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात मराठी सत्तेला खंबीर नेतृत्व देणाऱ्या महाराणीला पुढे अनेक वर्षे तुरूंगवासात कैदेत राहावे लागले ही एक अत्यंत दुदैवाची बाब होती.

या संपूर्ण सत्तांतराच्या काळात महाराणी ताराबाईच्या गटाचा मुख्य आधार असलेला चंद्रसेन जाधव मात्र कुठेही सत्तांतराला विरोध करतांना आढळून येत नाही. ताराबाईला मोठमोठी आश्वासने देऊन कोल्हापूर आणि सातारा या दोन्ही गादी एकत्र करण्याची चंद्रसेन जाधवांनी शपथ घेतली होती[१५]

परंतू तो चंद्रसेन जाधवही स्वत:च्या पराक्रमाला योग्य संधी न मिळाल्याने तो सर्जेराव घाटगे, सुलतानजी निंबाळकर यांच्यासमवेत सन १७१३ मध्ये करवीर राज्य[१६] सोडून मोगलांना जाऊन मिळाला.

## सेनापती चंद्रसेन जाधवांचा मोगलांकडे प्रवेश (सन १७१३) :—

महाराणी ताराबाईच्या पक्षातील सर्व मुख्य सरदार ताराबाईंना सोडून गेल्यामुळे सेनापती चंद्रसेन जाधवांची निष्ठाही डळमळीत झाली. चंद्रसेन इ.स. १७१३ मध्ये मोगल सरदार दाऊदखान पन्नी यास मिळाला असा उल्लेख मोगली अखबरातमध्ये आला आहे.[१८]

कोल्हापूरच्या छत्रपतींच्या दरबारात झालेले सत्तांतरण व अकार्यक्षम प्रशासन यामुळे सेनापती चंद्रसेन जाधवांच्या कर्तृत्वास येथे वाव मिळत नव्हता. मोगल बादशहाने चंद्रसेनाच्या कर्तबगारीचा योग्य आदर करून त्यास सन्मान दिला. यावरून चंद्रसेन जाधवराव यांनी आपली राजकीय कारकिर्द छत्रपती शाहू पक्षात सुरू करून तिचा प्रवास पुढे महाराणी ताराबाई पक्षाकडून मोगलांच्या पक्षात स्थिरावला.

चंद्रसेन जाधवांचा पराक्रम व त्यांचे मोगलांच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात घेऊनच मोगल बादशहाचे चंद्रसेन जाधवास ६० लक्ष रूपयांचा मुलुख जहांगिरी म्हणून मिळाला.[१९]

यावेळी चंद्रसेने जाधवांनी आपल्या जहांगिरीचे मुख्य ठिकाण कर्नाटक भालकी (बीदर) येथे केले. व तद्नंतर चंद्रसेन छत्रपती शाहू महाराजांचा बीमोड करण्यासाठी निजाम व कोल्हापूरच्या संभाजीमार्फत राजकारण करू लागले.

पहिले छत्रपती शिवाजी आणि नंतर छत्रपती संभाजी यांना हाताशी धरून मोगलांशी संधान साधून चंद्रसेने जाधवांनी या सातारा आणि कोल्हापूर दोन्ही गाद्या एक करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली.

चंद्रसेन जाधव सन १७५१ च्या सुमारास निधन पावले.[१७] चंद्रसेन जाधवांचा मृत्यू कोठे आणि कसा झाला याविषयी माहिती उपलब्ध होत नाही.

अशाप्रकारे चंद्रसेन जाधवांनी छत्रपती शाहू महाराजांकडून निराश झाल्यानंतर मराठी राज्याच्या सरसेनापतिपदाचा त्याग करून सातारा आणि कोल्हापूर ही दोन्ही राज्ये एक करून एकछत्री मराठा राज्य स्थापन करण्यासाठी मोगलाईत प्रवेश केला आणि त्यांनी जीवनाच्या शेवटपर्यंत प्रामाणिकपणे उद्दिष्टपूर्तीसाठी अखंड संघर्ष केला. सेनापती चंद्रसेन जाधवांची एकंदरीत कारकीर्द म्हणजे एका निश्चित ध्येयाची पूर्ती करण्यासाठी संघर्षरत राहणाऱ्या एका पराक्रमी योध्याची शौर्यगाधा असल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ सुची


१) गो.स.सरदेसाई, ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी, मुंबई, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस १९५७ पृ.क्र. ४५

२) गो.स. सरदेसाई मराठी रियासत खंड ३, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, पुर्नमुद्रण २०१० पृ.क्र. ६३

३) र.वि. (संपा.) मल्हार रामराव चिटणीस —विरचित थोरले शाहू महाराज यांचे चरित्र पुणे, व्हीनस प्रकाशन १९७६, पृ.क्र. १६८

४) एस.ए. बाहेकर, सिंदखेडकर जाधव घराण्याचा उत्तरकालीन शाखांचा चिकित्सक इतिहास, भाग—२, जळगाव, कसब प्रकाशन २००१ पृ.क्र. १५

५) गो.दा. दळवी., मराठा कुळांचा इतिहास भाग १, जाधव घराण्याची कैफियत, मुंबई, इंदुप्रकाश प्रेस १९१२ पृ.क्र. ७८
६) एस.ए. बाहेकर उपरोक्त पृ.क्र. १८
७) कित्ता पृ. १९
८) गो.दा. दळवी, जाधव घराण्याची कैफियत उपरोक्त पृ. ७८
९) एस.ए. बाहेकर उपरोक्त पृ.क्र. २३
१०) गो.स. सरदेसाई मराठी रियासत खंड ३, उपरोक्त पृ. ७०
११) गो.स. सरदेसाई; कृ.पा. कुळकर्णी, या. मा. काळे (संपा.) ऐतिहासिक पत्रव्यवहार, लेख ५
१२) एस.ए. बाहेकर उपरोक्त पृ.क्र. २४
१३) गो.स. सरदेसाई मराठी रियासत खंड—३, पृ.क्र. ७९
१४) स.मा. गर्गे; करवीर रियासत, कोल्हापूर, श्री शहाजी छत्रपती म्युजीयम ट्रस्ट, तिसरी आवृत्ती २००३ पृ.क्र. १३९
१५) गो.दा. दळवी, जाधव घराण्याची कैफियत उपरोक्त पृ.क्र. ७८
१६) स.मा.गर्गे, करवीर रियासत, उपरोक्त पृ.क्र. १४२
१७) गो.दा. दळवी, जाधव घराण्याची कैफीयत उपरोक्त पृ.क्र. ८८
१८) र.वि. हेरवाडकर (संपा.) थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, पृ.क्र. १२०
१९) एस.ए. बाहेकर उपरोक्त पृ.४९